शासकीय इमारतींच्या स्थापत्य कामाच्या निविदांमध्ये विद्युतीकरणाच्या कामाचा अंतर्भाव करुन एकत्रित निविदा काढणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
शासन निर्णय क्रमांक :- सीएटी १०९७/६९३/इमारती-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- २७/१/२००४.

**प्रस्तावना** - शासकीय इमारतींची बांधकामे करताना प्रचलित पध्दतीनुसार स्थापत्य व विद्युतविषयक कामे ही अनुक्रमे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत व त्याच विभागाच्या अधिपत्याखालील विद्युत विभागाकडून वेगवेगळे कंत्राटदार नेमून स्वतंत्रपणे केली जातात. अशा प्रकारे एकाच इमारतीत किंवा इमारती संकुलात विविध कंत्राटदारांकडून काम करीत असताना योग्य समन्वय न साधला गेल्यामुळे प्रकल्पाचे काम रेंगाळणे, झालेले बांधकाम विद्युत वायरींग, डक्टींगसाठी तोडणे व तोडलेल्या भागाची योग्य प्रकारे पुनर्बांधणी न करणे, इत्यादी बाबी उदभवत असतात असा आतापर्यंतचा अनुभव आहे. त्याचप्रमाणे दोन कंत्राटदारांचे साहित्य फिटींग इत्यादीची मोडतोड झाल्यास, त्याबाबत वाद निर्माण होऊन त्याची सुरक्षिततेची जबाबदारी एकमेकांवर ढकलण्यांत येते. विद्युतीकरण कंत्राटदाराचे काम लांबल्यास इमारतीस रंगाचा अंतिम थर देणे, अंतिम पॉलिशींग, फिनिशींग आणि साफसफाई करणे इत्यादी कामे रेंगाळतात व त्यामुळे स्थापत्य कामाच्या कंत्राटदाराना या सबबीवर भाववाढीसह मुदतवाढ मागण्यास वाव मिळतो. पर्यायाने प्रकल्प पूर्ण होण्यास लागणारा विलंब व प्रकल्प खर्चातील वाढ टाळण्याच्या दृष्टीने करावयाच्या उपाय याजनेचा एक भाग म्हणून इमारतीची स्थापत्य व विद्युतीकरणाची कामे एकत्रित निविदा मागवून एकाच कंत्राटदाराकडून केल्यास, वरील अडचणी टाळता येवू शकतात. अशा प्रकारची पध्दत केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने देखील जागतिक बँकेच्या अर्थसहाय्यातून बांधलेल्या तंत्र शिक्षण खात्याच्या प्रकल्पामध्ये ही पध्दत स्वीकारली असून, त्याची फलनिष्पती उत्साहवर्धक असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. सबब या पध्दतीचा अवलंब करण्याचा प्रस्ताव काही दिवस शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय** - शासकीय इमारतीच्या रु. १ कोटी व त्यापेक्षा अधिक किंमतीच्या बांधकामाच्या स्थापत्य व विद्युत कामाच्या एकत्रित निविदा काढण्यास या शासन निर्णयान्वये खालील पध्दतीच्या पालनाच्या आधीन राहून शासन मंजूरी देत आहे.

२. वरील एकत्रित निविदासाठी खालील पध्दतीचा अवलंब करावा.

रोटा प्रिंट/एच–1085(2000–2–04)1

१) सर्वसाधारणपणे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (स्थापत्य) यांनी रु. १ कोटीवरील किंमतीच्या इमारतीच्या बांधकामास पुरेशी अर्थसंकल्पीय तरतूद असल्यास, एकत्रित निविदा बोलवाव्यात. काही अपवादात्मक प्रकरणी (उदा. मध्यवर्ती वातानुकूलीत यंत्रणा, जुन्या उदवाहनाच्या ऐवजी नवीन उदवाहन बसविणे इ.) विद्युत विभागामार्फत करावयाच्या कामांची अंदाजित रक्कम ही स्थापत्य विभागाच्या कामाच्या मानाने खूपच जास्त असेल, अशा प्रकरणी निविदा बोलाविणे, निविदा मान्य करणे इ. बाबी सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागामार्फत करण्यात येतील. अशा कामासाठी स्थापत्य अभियंत्यांकडून त्या कामाच्या प्रारुप निविदा संबंधित विद्युत विभागाच्या सक्षम अधिकाऱ्यांकडे एकत्रित निविदा काढण्यासाठी पाठविण्यात येतील.

२) स्थापत्य व विद्युत कामाच्या सविस्तर अंदाजपत्रकास संबंधित विभागाच्या सक्षम अधिकाऱ्यांनी तांत्रिक मंजूरी सर्वसाधारणपणे एकाच वेळी द्यावी.

३) प्रारुप निविदा तयार करुन त्यास मान्यता देत असताना स्थापत्य व विद्युतविषयक बाबींसाठी त्या त्या विभागाच्या सक्षम अधिकाऱ्याने त्यांचेशी संबंधित भागास परिशिष्ट ब मधील विनिर्देश, अटी व शर्ती इत्यादीस वेगवेगळी मंजूरी द्यावी.

४) एकत्रित प्रारुप निविदेत स्थापत्य व विद्युत कामासाठी वेगवेगळे परिशिष्ट "ब" मध्ये अनुक्रमे भाग-१ व भाग-२ करुन त्यास त्या त्या विभागाच्या सक्षम अधिकाऱ्याने वरीलप्रमाणे मंजूरी प्राप्त झाल्यानंतर एकत्रित निविदा मागवाव्यात.

५) निविदा घेणेसाठी स्थापत्य ठेकेदाराकडे विद्युत काम करणेची नोंदणी नसेल तर अशा प्रकरणी स्थापत्य ठेकेदारांस योग्य त्या वर्गातील विद्युत ठेकेदाराबरोबर जॉईंट व्हेंचर करता येऊ शकेल. किंवा विद्युत कामाचा भाग योग्य वर्गात नोंदणीकृत विद्युत कंत्राटदाराकडून पोटकराराने करुन घेता येऊ शकेल. मात्र याबाबत स्थापत्य कामाच्या ठेकेदारांची संपूर्ण कामांसाठी (स्थापत्य व विद्युत) जबाबदारी पूर्णतः असेल.

६) निविदा प्राप्त झाल्यावर लिफाफा १ मधील विद्युत कंत्राटदारांच्या/पोट कंत्राटदाराच्या कागदपत्रांची जसे कंत्राटदारांचे लायसंन्स, नोंदणी प्रमाणपत्र, केलेल्या कामाची उलाढाल इत्यादी तपशील विद्युत विभागाचे सक्षम अधिकारी यांनी पडताळणी करुन त्याबाबत मान्यतेचे अभिप्राय द्यावेत. स्थापत्य व विद्युत विभागाचे अभिप्राय घेवून निविदा मान्यतेची कार्यवाही स्थापत्य विभागाने करावी.

७) कामाची मुदत ही विद्युतविषयक कामासाठी लागणारा वेळ लक्षात घेवून निश्चित करण्यांत यावी.

८) विद्युतविषयक बाबी उदा. विद्युतीकरण, उदवाहने, ट्रान्सफार्मर बसविणे, आवारांतील विद्युतीकरण, मिटर्स बसविणे, विद्युत पुरवठा मिळविणे, इत्यादी कामे तसेच महानगरपालिका व संबंधित विद्युत प्राधिकरण यांचेशी विद्युत विभागाच्या सक्षम अधिकाऱ्यांनी समन्वय साधून सर्व विद्युतविषयक बाबींसाठी परवानगी/ना-हरकत प्रमाणपत्र इत्यादीची जबाबदारी मुख्य कंत्राटदाराची असेल.

९) विद्युतविषयक कामावर पर्यवेक्षण व देखरेख सध्याच्या प्रचलित पध्दतीप्रमाणेच संबंधित विद्युत विभागाचे अधिकारी करतील व यासंदर्भात प्रचलित पध्दतीमध्ये काहीही बदल नाही.

१०) विद्युतविषयक कामाची मोजमापे विद्युत विभागाने घेऊन त्यानुसार तयार करण्यांत आलेली देयके सक्षम अधिकारी यांनी सध्याच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे पारित करुन स्थापत्य विभागाकडे देयके अदा करण्यासाठी पाठवावी व स्थापत्य विभागाने स्थापत्य कामाबरोबर विद्युत कामाच्या खर्चाचा लेखा एकत्रित ठेवावा. कामांसाठीची सुरक्षा ठेव परत करणेपूर्वी विद्युत विभागाच्या सक्षम अधिकाऱ्यांचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक असेल.

११) उपभोक्ता खात्याची गरज किंवा अर्थ सहाय्य करणाऱ्या यंत्रणेच्या एकत्रित निविदा रु.१.०० कोटी पेक्षा कमी किंमतीच्या असल्यास त्यासाठी एकत्रित निविदा काढण्याचा स्वेच्छाधिकार संबंधित मुख्य अभियंता यांना असेल.

३. हे आदेश निर्गमित करण्यापूर्वी प्रसिध्द झालेल्या निविदांसाठी लागू राहणार नाहीत, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

४. या शासन निर्णयाची अंमलबजावणी स्थापत्य व विद्युत विभागाच्या संबंधित क्षेत्रीय व नियंत्रक अधिकाऱ्यांनी सामंजस्याने व एकमेकांच्या सहकार्याने सौदार्हपणे करुन त्यानुसार कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी, याबाबत स्थापत्य विभागाने विद्युत विभागाशी समन्वय साधावा.

५. सदर आदेश हे विभागाच्या आंतर वित्तीय सल्लागार व उप सचिव यांच्या सहमतीने काढण्यांत येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( शि. वि. तामखडे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

मा. मुख्यमंत्री, ह्यांचे प्रधान सचिव,
मा. मंत्री (सा.बां.)/पाटबंधारे ह्यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री (सा.बां.)/पाटबंधारे ह्यांचे खाजगी सचिव,
वित्त विभाग/सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,
महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र राज्य मुंबई/नागपूर,
महालेखापाल, लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,

सचिव (बांधकामे)/सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, ह्यांचे स्वीय सहाय्यक,
पाटबंधारे विभाग, मंत्रालय,
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय,

प्रत, माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी,

सर्व मुख्य अभियंते, सा.बां.विभाग/पाटबंधारे विभाग,
मुख्य अभियंता, बृहन्मुंबई क्षेत्र विकास प्राधिकरण, मुंबई, महाराष्ट्र,
गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा), मुंबई,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई,
व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ, (सिडको), निर्मल बिल्डीग, नरीमन पॉइंट, मुंबई/महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई,
पाटबंधारे विकास महामंडळ, कृष्णा/तापी/गोदावरी/विदर्भ,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई,
आयुक्त, सर्व महानगरपालिका (२ प्रतींसह),
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषदा,
अधीक्षक अभियंता, व प्रादेशिक अधिकारी, भूपृष्ठ वाहतूक मंत्रालय (MOST),चेंबूर, मुंबई,
सर्व अधीक्षक अभियंते, सा.बां.विभाग/पाटबंधारे विभाग,
अधीक्षक अभियंता, पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, वरळी, मुंबई/महानगरपालिका,ठाणे/पुणे/कल्याण,
संचालक, उपवने आणि उद्याने, मुंबई,
प्रतिनियुक्तीवरील सर्व अधिकारी,
सर्व कार्यकारी अभियंते,सा.बां.विभाग/पाटबंधारे विभाग/जिल्हापरिषद,
सर्व अधिकारी/कार्यासन अधिकारी,सा.बां.विभाग/पाटबंधारे विभाग, मंत्रालय,
कार्यासन इमारती-२ (निवड नस्ती).

---